अति.महा.आयुक्त (ज) कार्यालय,

आस्थापना विभाग, पुणे मनपा.

जा.क्र. :- अतिमआ/साप्रवि/आस्था/४७८०

दिनांक :- ८/१०/२०२०

-: आदेश :-

विषय :- <u>कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपायाबाबत.</u>
कोरोना विषाणू प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेअंतर्गत विविध विभागाकडे उपलब्ध करून दिलेल्या शिक्षण विभाग (प्राथमिक) कडील उप शिक्षकांना रोटेशन नुसार उपलब्ध करून देणेबाबत

संदर्भ :-
१) साथरोग अधिनियम १८९७ ची अमलबजावणी सुरु झाल्याबाबतची अधिसूचना दि.१३.०३.२०२०.
२) महाराष्ट्र कोव्हिड-१९ उपाययोजना नियम,२०२०.
३) केंद्रीय आपत्ती व्यवस्थापन अधिनियम २००५
४) कार्यालयीन आदेश जा.क्र.अति.मआ/साप्रवी/आस्था/२४०४ दि.१३/०७/२०२० चे शहर अभियंता (आपत्ती व्यवस्थापन कक्ष )बांधकाम विभाग आदेश
५) कार्यालयीन आदेश जा.क्र.अति.मआ/साप्रवी/आस्था/२४४८ दि.१५/०७/२०२० चे परदेशी नागरिक हॉटेल व्यवस्था आदेश
६)कार्यालयीन आदेश जा.क्र.अति.मआ/साप्रवी/आस्था/२८१८ दि.२८/०७/२०२० चे रुग्णालय बेड व्यवस्थापन आदेश
७)कार्यालयीन आदेश जा.क्र.अति.मआ/साप्रवी/आस्था/३०४५ दि.०६/०८/२०२० चे रुग्णालय बेड व्यवस्थापन आदेश
८)कार्यालयीन आदेश जा.क्र.अति.मआ/साप्रवी/आस्था/३४३२ दि.१९/०८/२०२० चे परिमंडळ व क्षेत्रीय कार्यालय निहाय पर्यायी आदेश

पुणे महानगरपालिका हद्दीत सध्या कोरोना विषाणूचा प्रादुर्भाव वाढत आहे.त्याचा प्रसार होऊ नये यासाठी पुणे महानगरपालिका वेगवेगळया स्तरावर कोरोना विषाणू प्रतिबंधात्मक उपाययोजना केल्या जात आहेत.

संदर्भ क्र ४ ते ८ अन्वये कोरोना विषाणू प्रादुर्भाव रोखण्यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजनेअंतर्गत शहर अभियंता (आपत्ती व्यवस्थापन कक्ष) बांधकाम विभाग, परदेशी नागरिक हॉटेल व्यवस्था, रुग्णालय बेड व्यवस्थापन, परिमंडळ व क्षेत्रीय कार्यालय निहाय पर्यायी सेवक विविध कामासाठी विविध कामासाठी प्राथमिक शिक्षण विभागाकडील शिक्षकांना आदेश निर्गमित करण्यात आलेले आहेत.

आता संदर्भ क्र ४ ते ८ अन्वये नेमणूक केलेल्या व प्रत्यक्ष कामावर हजर झालेल्या सर्व शिक्षकांना या आदेशान्वये कार्यमुक्त करावे, सदर शिक्षकांना कार्यमुक्त करताना ज्या शिक्षकांनी प्रत्यक्ष ३० दिवस काम केलेले आहे अशाच शिक्षकांना संबंधित विभागाने कार्यमुक्त करावे. कार्यमुक्त झालेल्या शिक्षकांनी शैक्षणिक कामासाठी त्वरीत शाळेत रुजू व्हावे व रुजू झालेबाबतचा अहवाल प्रशासकीय अधिकारी प्राथमिक शिक्षण विभाग यांना सादर करावा.

परंतू सदर कार्यमुक्त केलेल्या शिक्षकांना ऐवजी रोटेशन नुसार शिक्षण विभाग (प्राथमिक)कडील सोबत जोडलेल्या यादीनुसार उपशिक्षकांना विविध कार्यालयाकडे उपलब्ध करून देण्यात येत आहे. सबंधित कर्मचारी यांनी नेमून दिलेल्या विभागातील अधिकारी यांचे नियंत्रणाखाली त्यांचे आदेशानुसार कामकाज करावयाचे आहे.